Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# शेतमालाच्या संभाव्य किमतींचा अहवाल

## (जानेवारी ते मार्च २०२३)

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, पुणे

**नोव्हेंबर -२०२२**

# सोयाबीनच्या संभाव्य किमती- जानेवारी ते मार्च २०२३

सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो. अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, नोव्हेंबर- २०२२) अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात ३९०.९९ दशलक्ष टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ९.९२ टक्केनी (३५५.६९ दशलक्ष टन, २०२१-२२) अधिक आहे. भारतात सन २०२२-२३ मध्ये सोयाबीनचे उत्पादन ११.५० दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत कमी आहे. मागील वर्षी (२०२१-२२) मध्ये ११.९० दशलक्ष टन उत्पादन झाले आहे.

मागील तीन महिन्याच्या कालावधीत (ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२२) या दरम्यान लातुर बाजारातील सोयाबीनच्या किमतींत घसरता कल दिसून येतो. ऑगस्ट २०२२ मध्ये सोयाबिनच्या सरासरी किमती रु.६१४९ प्रती क्विंक. वरून ऑक्टोबर २०२२ मध्ये रु.५०७१ प्रती क्वि. पर्यत कमी झाल्या आहेत.

सन २०२२-२३ या खरीप हंगामासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किमत (MSP) रु.४३०० प्रती क्वि. आहे. मागील दोन वर्षातील लातूर बाजारातील सोयाबीनच्या जानेवारी ते मार्च या कालावधीतील सरासरी किमती पुढील प्रमाणे-

| वर्ष | जानेवारी ते मार्च सरासरी किमती (रु./प्रती क्वि) |
|---|---|
| **२०२१** | ४७६९ |
| **२०२२** | ६६९४ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमितीय विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती विचारात घेता, माहे जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत लातूर बाजारात सोयाबीनच्या संभाव्य किमती **रु. ५८०० ते ६५००** प्रती क्वि. या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

## कापसाच्या संभाव्य किंमती - जानेवारी ते मार्च २०२३

कापूस हे भारतातील सर्वात महत्वाच्या व्यावसायिक पिकांपैकी एक प्रमुख पिक आहे. भारतातील आर्थिक महत्त्वामुळे याला "व्हाइट-गोल्ड" असेही संबोधले जाते. अंदाजे ६ दशलक्ष कापूस उत्पादक शेतकरी आणि ४०-५० दशलक्ष कापूस प्रक्रिया आणि व्यापार यामध्ये गुंतलेल्या लोकांचे जीवनमान टिकवून ठेवण्यासाठी कापूस पिक प्रमुख भूमिका बजावते.

जागतिक स्तरावर भारत हा प्रमुख कापूस उत्पादक देश असून त्यानंतर चीन आणि अमेरिका यांचा क्रमांक लागतो. एकूण जागतिक कापूस उत्पादनात भारताचा वाटा सुमारे २५ टक्के आहे. ९ नोव्हेंबर रोजी प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, यूएस डिपार्टमेंट ऑफ ॲग्रिकल्चर (USDA) ने सुधारित जागतिक कापूस ताळेबंदात कमी उत्पादन, वापर, व्यापार आणि संपलेल्या साठ्याचा समावेश केला आहे. गेल्या महिन्याच्या तुलनेत १.६ दशलक्ष गाठींनी उत्पादन कमी झाले आहे. (स्रोत-USDA)

वर्ष २०२२-२३ दरम्यान भारतात अंदाजे कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत ५ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे तसेच जागतिक स्तरावर अंदाजे उत्पादन ०.७२ टक्क्यांनी वाढणार असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत, वर्ष २०२२-२३ दरम्यान मागील वर्षाच्या तुलनेत आयातीत ५५ टक्के वाढ आणि निर्यातीत २३ टक्के घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक स्तरावर मागील वर्षाच्या तुलनेत आयातीत ३.८४ टक्क्यांनी वाढलेला दिसत असून निर्यातीत १.८१ टक्क्यांनी घट होणार असल्याचे दिसून येते. जागतिक स्तरावर चीन प्रमुख कापूस उपभोक्ता असून चीनचा वाटा ३३ टक्के आहे त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. वर्ष २०२२-२३ मध्ये देशांतर्गत उपभोग देखील राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर २ टक्क्यांनी कमी होणार असल्याचा अंदाज दिसून येत आहे.

सन २०२२-२३ हंगामासाठी कापसाची किमान आधारभूत किंमत लांब धाग्याच्या कापसासाठी रु. ६३८० प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु. ६०८० प्रति क्विंटल इतकी आहे. राजकोटच्या बाजारपेठेत कापसाच्या किमतीत गेल्या वर्षभरापासून सातत्याने वाढ होत आहे. कापसाच्या वायदे बाजारातील किमतीमध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे. MCX वरील १७ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या कापसाच्या किंमती पुढील प्रमाणे:

| डिलिवरी महिना | किंमत (Per Bale of 170 kgs.) |
|---|---|
| **नोव्हेंबर २०२२** | ३२७७० |
| **डिसेंबर २०२२** | ३१९७० |
| **जानेवारी २०२३** | ३३५०० |

मागील २ वर्षातील राजकोट बाजार समितीतील कापसाच्या माहे जानेवारी ते मार्च महिन्यातील सरासरी किमती पुढीलप्रमाणे:

| वर्ष | जानेवारी ते मार्च किंमती (रु. प्रती क्विंटल) |
|---|---|
| **२०२०** | ५०२९ |
| **२०२१** | ५७०६ |
| **२०२२** | ९५४६ |
| | |

मागील ११ वर्षांच्या किंमतीच्या गुणात्मक व परिमाणवाचक विश्लेषणानुसार तसेच बाजारातील सध्यस्थितीवरून, जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत राजकोट बाजारातील कापसाच्या संभाव्य किंमती सरासरी **रु. ७५०० - ९५००** प्रति क्विंटल या दरम्यान राहतील, असे अपेक्षित आहे.

## तूरीच्या संभाव्य किंमती- जानेवारी ते मार्च २०२३

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशचा वाटा ६०% पेक्षा जास्त आहे. अकोला बाजारपेठेतील ऑक्टोबर महिन्यातील तूरीच्या किमती रु. ६९००/- ते ७७००/- प्रतिक्विंटल या दरम्यान असलेल्या दिसतात. भारत सरकारने सन २०२२-२३ साठी खरीप पिकांच्या उत्पादनाचा पहिला अंदाज जाहीर केला आहे. ज्यानुसार अंदाजे ३८.९० लाख टन तूर उत्पादन अपेक्षित असून मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत १० टक्क्यांनी कमी आहे. सध्याचे बाजारभाव, कमी उत्पादन आणि कमी तूर उपलब्धता या बाबी लक्षात घेता तुरीचे भाव चढेच राहतील.

तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी ४ लक्ष टन इतकी मर्यादा ठरवून दिली आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे 'मुक्त आयात धोरण' दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत लागू राहण्याची शक्यता आहे.

जानेवारी पासून बाजारपेठेत तुरिची जास्त आवक सुरु होईल. वर्ष २०२२-२३ साठी तूरीची किमान आधारभूत किंमत रु. ६,६००/- प्रति क्विंटल इतकी आहे. सन २०२०, २०२१ व २०२२ मधील अकोला बाजारपेठेतील तूरीच्या जानेवारी ते मार्च दरम्यानच्या किमती पुढीलप्रमाणे:

| वर्ष | जानेवारी ते मार्च किंमत (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| **२०२०** | ४,४८४ |
| **२०२१** | ६,३०१ |
| **२०२२** | ६,०१९ |

सध्यस्थितीत बाजाराचा कल विचारात घेता, अकोला बाजारपेठेतील तूरीची किंमत जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत **रु. ६५०० ते ७५००/-** प्रति क्विंटल इतकी राहण्याची शक्यता आहे. सदर किंमत ही तुरीच्या वाजवी सरासरी गुणवत्तेवर आधारित आहे.

# हरभऱ्याच्या संभाव्य किंमती- जानेवारी ते मार्च २०२३

हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. सन २०२०-२१ मध्ये भारतातील एकूण हरभऱ्याचे क्षेत्र आणि उत्पादन अनुक्रमे ९९.९६ लाख हेक्टर आणि ११९.९० लाख टन इतके होते. सन २०२१-२२ मध्ये हरभऱ्याचे अंदाजे उत्पादन सुमारे १३७.५ लाख टन असण्याची शक्यता आहे. सन २०२०-२१ या कालावधीत भारताच्या एकूण डाळींच्या निर्यातीत सुमारे ६० टक्के वाटा हरभऱ्याचा आहे.

फेब्रुवारी पासून बाजारपेठेत हरभऱ्याची जास्त आवक सुरु होईल. सन २०२१-२२ या हंगामासाठी हरभऱ्याची किमान आधारभूत किमत (MSP) रु.५२३० प्रती क्विंटल आहे. तसेच भारत सरकारने रब्बी पणन हंगाम २०२२-२३ मध्ये हरभऱ्यासाठी रु. ५३३५ प्रति क्विंटल किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे. मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर व जानेवारी ते मार्च या कालावधीतील सरासरी किमती पुढील प्रमाणे-

| वर्ष | जानेवारी ते मार्च<br>सरासरी किमती (रु./प्रती क्विं.) |
|---|---|
| **२०२०** | ३७९६ |
| **२०२१** | ४६१५ |
| **२०२२** | ४६०७ |

मागील ११ वर्षांच्या किंमतीच्या गुणात्मक व परिमाणवाचक विश्लेषणानुसार तसेच बाजारातील सध्यस्थितीवरून, जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत लातूर बाजापेठेतील हरभऱ्याच्या संभाव्य सरासरी किंमती रु. **४५०० - ५०००** प्रति क्विंटल या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सदर किंमत ही हरभऱ्याच्या वाजवी सरासरी गुणवत्तेवर आधारित आहे.

# मक्याच्या संभाव्य किंमती- जानेवारी ते मार्च २०२३

मका हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. या प्रमुख देशांमध्ये एकूण जागतिक उत्पादनाच्या ७६ टक्के उत्पादन होते. अमेरिकेच्या कृषी विभागाच्या (WASDE, Nov- 2022), अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात ११६८.७४ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन होण्याच्या शक्यता आहे, जे मागील वर्षांच्या तुलनेत ४ टक्के कमी होण्याचा अंदाज आहे, मागील वर्षी जागतिक १२१७.३० दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन झाले होते. भारतात सन २०२२-२३, या हंगामात मक्याचे उत्पादन ३२ दशलक्ष मेट्रिक टन होण्याची शक्यता वर्तवली आहे. मागील वर्षी (२०२१-२२) या कालावधीमध्ये ३३ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन झाले होते. देशात खरीप २०२२-२३ हंगामात मक्याचे उत्पादन २३.१० दशलक्ष टन होईल असा अंदाज आहे.

मागील तीन महिन्यात (ऑगस्ट ते ऑक्टोबर- २०२२) दरम्यान नांदगांव बाजारात मक्याच्या किंमतीचा उतरता कल दिसून येतो. ऑगस्ट मध्ये मक्याची सरासरी किंमत रुपये २३२४ प्रति क्विंटल होती, तर ऑक्टोबर महिन्यात किंमतीत घट होऊन त्या सरासरी रुपये १७४० प्रति क्विंटल इतकी झाली होती. खरीप हंगाम २०२२-२३ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. १९६२ प्रति क्विं. इतकी आहे

मागील दोन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या सरासरी किंमती (रुपये/क्विंटल) पुढील प्रमाणे:

| वर्ष | जाने ते मार्च |
|---|---|
| **२०२०-२१** | १२७३ |
| **२०२१-२२** | १९१९ |

दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या NCDEX छिंदवाडा बाजारातील मक्याच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे:

| महिना | किंमती (रुपये/क्विंटल) |
|---|---|
| २० डिसेंबर २०२२ | २२४९ |
| २० जानेवारी २०२३ | २२४९ |
| २० फेब्रुवारी २०२३ | २२४९ |
| २० मार्च २०२३ | २२४९ |

मागील काही वर्षातील मक्याच्या किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती, माहे जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत नांदगाव बाजारातील मक्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रुपये १८००ते ते २४०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहण्याच्या शक्यता आहे. हा किमंतीचा अंदाज वाजवी सरासरी गुणवत्तेसाठी असेल.

सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज डिसेंबर २०२२ मध्ये प्रकाशित केला जाईल.

*टीप: सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक आणि सरकारी धोरणे यामध्ये होणाऱ्या बदलांमुळे संभाव्य किमतींमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किमतींपेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा.*


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषी**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,

सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६

फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री नं- १८०० २१० १७७०, ई-मेल : **mirmc.smart@gmail.com** , वेबसाईट:

**https://www.smart-mh.org/**